## - प्रकरण पाचवे -

### सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड सांगली प्रगतीचा व योजनांचा आढावा.

# प्रकरण ५ वे

सदर प्रकरणामध्ये प्राथमिक शिक्षक बँकेच्या व्यवस्थापकांशी व संचालक मंडळाशी चर्चा व मुलाखतीद्वारे बँकेसंबंधी माहिती घेण्यात आलेली आहे. त्याचा घोषवारा खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

## ५.१ प्राथमिक शिक्षक बँकेचे गुंतवणूक धोरण :-

कोणत्याही व्यवसायाची किंवा उद्योगाची गुंतवणूक ही बाब महत्वाची असते. त्यादृष्टीने बँकेच्या संचालकांशी बँकेच्या गुंतवणूक धोरणाबाबत चर्चा करण्यात आली. या चर्चेतून असे दिसून आले की, बँका या ठेवी आकर्षित करतात व त्यांची गुंतवणूक करतात. येणाऱ्या उत्पन्नातून ठेवीदारांना व्याज दिले जाते. बँकेचे खेळते भांडवल सभासदांनी ठेवलेल्या ठेवी व भाग भांडवल मिळून तयार झालेले असते. बँकेला आपल्या निधीची गुंतवणूक योग्य प्रकारे करता आली पाहिजे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे प्रत्येक बँकेस त्यांच्या एकूण टाईम लिबीलीटीच्या २५% टक्के लिक्वीड असेटस ठेवावे लागतात. तसेच ठेवीदारांच्या व कर्जदारांच्या गरजा भागविण्यासाठी काही रक्कम रोख स्वरुपात स्वतःजवळ ठेऊन उरलेली रक्कम ठेव स्वरुपात मध्यवर्ती बँकेकडे ठेवलेली आहे. याशिवाय बँकेचे लोकल सांभाळण्यासाठी सरकारच्या योजना, किसान विकास पत्र, नॅशनल सर्टीफिकेट यामध्ये अगदी थोड्या प्रमाणात गुंतवणूक केली जाते.

## ५.२ प्राथमिक शिक्षक बँकेचे भांडवल :-

बँक व्यवसायाचे जसे स्थिर भांडवल महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे खेळते भांडवलही महत्वाचे आहे. खेळत्या भांडवलाबाबतीत संचालक मंडळाशी चर्चा करण्यात आली. ही बँक लोकांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करून जास्तीत

जास्त ठेवी जमविण्याचा प्रयत्न करते. खेळते भांडवल हे नेहमी वाढत जाते. कारण सभासद मासिक वर्गणी प्रत्येकी ५०/- रुपये प्रमाणे घेतली जाते. साधारणत: ८ लाखापर्यन्त मासिक वर्गणी वाढते. मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेऊनही कर्जपुरवठा केला जातो. त्यामुळे खेळते भांडवल हे नेहमी वाढत जात आहे.

## ५.३ प्राथमिक शिक्षक बँकेची यशस्वीता - ठेवी :-

बँकेच्या स्थैर्याचा व प्रगतीचा दिपस्तंभ म्हणजे बँकेच्या ठेवी. बँक व्यवसायाची यशस्वीता ठेवीवर अवलंबून असते. ही बँक दाम दिडपट, दुप्पट, तिप्पट, पेन्शन ठेव योजना, कॅश सर्टीफिकेट, रिकरिंग, पिग्मी, अशा प्रकारच्या सर्व ठेवी या बँकेमध्ये ठेऊन घेतल्या जातात. पिग्मी व रिकरिंग ठेव योजनामुळे बँकेच्या ठेवीमध्ये विशेष वाढ होत आहे. आर.बी.आय. चे बंधन असल्यामुळे व्याजदर अधिक ठेवता येत नाही. ठेवीमध्ये अल्पमुदत, मध्यममुदत व दीर्घमुदतीच्या ठेवी ठेऊन घेतल्या जातात.

## ५.४ प्राथमिक शिक्षक बँकेची इतर बँकांशी स्पर्धा जाणवत नाही :-

ठेवी गोळा करण्यामध्ये बँका बँकामध्ये स्पर्धा चाललेली असते. परंतु या प्राथमिक शिक्षक बँकेत ठेवी गोळा करण्यासंबंधी स्पर्धा जाणवत नाही. कारण जे प्राथमिक शिक्षक सभासद आहेत. ते प्रामुख्याने ठेवी या बँकेत ठेवतातच शिवाय इतर लोकांच्या ठेवी ठेऊन घेतल्या जातात. या ठेवी वाढाव्यात म्हणून प्रयत्न केला जातो. प्राथमिक शिक्षक बँक लिमीटेड असल्याने विशेष स्पर्धा जाणवत नाही.

## ५.५ प्राथमिक शिक्षक बँकेचे कर्जव्यवहार :-

बँकेला आपल्या व्यवसायात ठेवी प्रमाणेच कर्ज विषयक धोरण आखावे लागते. संचालक मंडळाशीच चर्चा केली असता, असे दिसून आले की, ही बँक पगार

तारण कर्ज व इतर वस्तू तारण ठेऊन कर्ज देते. पगार तारणी कर्जाच्या बाबतीत वसुलीच्या वेळी व्याज हे पगारातून वसुल केले जाते. परि थकबाकीचे प्रमाण कमी होते. कर्जाचा व्याजदर हा इतर बँकांपेक्षा १ ते २ % कमी आहे. सभासदांना याचा फायदा होतो.

कर्जाची रक्कम ठरवित असताना बँकेला शिल्लक ठेवाव्या लागणाऱ्या रकमेचे प्रमाण, गुंतवणूकीचे प्रमाण, रिझर्व्ह बँकेचे धोरण या सर्वाचा विचार करावा लागतो. कर्ज देत असताना बँक सभासदांकडून योग्य नमुन्यात अर्ज भरून घेते. तो अर्ज संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये ठेवला जातो. नंतर त्या अर्जाची छाननी करून चर्चा करून कर्ज मंजूर केले जाते. कर्ज देताना कोणत्याही,प्रकारचा भेदभाव केला जात नाही.

## ५.६ प्राथमिक शिक्षक बँकेचे सभासदाविषयी धोरण :-

बँकेच्या संचालकांशी नविन सभासद स्विकारण्याबाबत काय धोरण आहे, याबाबत चर्चा करण्यात आली. जो प्राथमिक शिक्षक आहे व तो इच्छुक आहे. अशा सर्व लोकांना सभासदत्व मिळते. शिवाय इतर खाजगी मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकांना सभासदत्व मिळते. काही वेळा आपोआपच सभासदांची संख्या कमी होते. रिटायरमेंट व मयत सभासदांची संख्या जास्त असेल तर सांगली जिल्ह्यामध्ये एकूण जे प्राथमिक शिक्षक आहेत. त्यापैकी ९० ते ९५ % या बँकेचे सभासद आहेत.

## ५.७ ठेवी - विमा महामंडळाची स्थापना :-

अलीकडील काळात ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास दृढ व्हावा. त्याच्या ठेवींना संरक्षण मिळावे म्हणून शासनाने ठेव विमा महामंडळाची स्थापना केली आहे. सभासदांच्या ठेवीला संरक्षण म्हणून ठेव विमा योजना ही उत्कृष्ट

योजना आहे. ही १,००,०००/- रुपये पर्यन्त आहे. यापेक्षा आणखी मर्यादा म्हणून संघटनेमार्फत प्रयत्न सुरु आहेत.

## ५.८ थकबाकीचे प्रमाणशीर प्रमाण :-

बँकेने दिलेल्या कर्जाच्या बाबतीत थकबाकीचा विषय महत्वाचा असतो. कारण थकबाकीचा विपरित परिणाम बँकेच्या नफा मिळविण्याच्या क्षमतेवर होत असतो. प्राथमिक शिक्षक बँकेची थकबाकी वाढते आहे. कारण सभासदांना नोकरीतून कमी करणे, नोकरी सोडून देणे, मुदतपूर्व निवृत्ती घेतल्यामुळे, मयत सभासद इत्यादी कारणामुळे थकबाकी वाढते आहे. ही थकबाकी जरी वाढत असली तरी म्हणावी इतकी थकबाकी रहात नाही. कर्जाची वसुली ही आपोआपच पगारातून होत असते. ही थकबाकी वसुल करण्यासाठी काही उपाय योजले जातात. थकबाकी जमिनदाराकडून वसुल करणे व ही थकबाकी वसुल झाली नाही तर दावे दाखल करुन वसुल करुन घेतली जाते. याशिवाय नंतरचे कर्ज देत असताना पहिली थकबाकी वसुल करुन घेतली जाते.

## ५.९ वाढता प्रशासकीय खर्च :-

१९८१ ते १९९४ या कालावधीत प्राथमिक शिक्षक बँकेच्या प्रशासकीय खर्च वाढत असल्याचे दिसून आले आहे. वाढत्या खर्चात शाखाविस्तार, नोकर भरती वाढ, बँकेच्या उलाढालीत वाढ यामुळे कार्यालयीन खर्चात वाढ, स्टेशनरी, छपाई, भत्ते, शाखांच्या जागेचे भाडे, ऑडीट फी मधील वाढ यामुळे प्रशासकीय खर्च वाढत आहे.

५·१० नफ्याचे वाटप :-

कोणतीही उद्योग संस्था आपल्या नफ्यातील काही हिस्सा आपल्या कामगारांना देते· त्याचप्रमाणे या प्राथमिक शिक्षक बँकेचेही आहे· लाभांश हा बँकेच्या सांपत्तीक स्थितीवर अवलंबून असतो· तसेच लाभांश वाटपावर सहकार खात्याची काही बंधने आहेत· त्या बंधनांचाही विचार बँकेला करावा लागतो· लाभांश म्हणून नफ्याचा भाग हा कमी प्रमाणात वाटला जातो· सहकार खात्याने १४ टक्के लाभांश देणेबाबत परवानगी दिली आहे· प्राथमिक शिक्षक बँक ३ ते ५% टक्के पर्यन्तच लाभांश वाटप करते· कारण लाभांश वाटपापूर्वी नफ्याचा भाग हा रिबेट म्हणून दिला जातो· आजपर्यन्त तो ३०% पर्यन्त दिला आहे· रिबेट दिल्यामुळे निव्वळ नफा कमी शिल्लक राहतो व तो ही लाभांश म्हणून दिला जातो·

५·११ शाखाविस्तार :-

बँकांच्या विश्वासपात्र कामकाजावर त्यांची यशस्वीता अवलंबून असते· त्यामुळे बँकेच्या शाखा विस्ताराला चालना मिळते· आजपर्यन्त प्राथमिक शिक्षक बँकेच्या एकूण १४ शाखा मुख्य कार्यालयासहित आहेत· याशिवाय आणि आठ शाखांचे प्रयोजन पाठवून दिले आहे· शाखा वाढीच्या प्रस्तावामध्ये भिलवडी, भवानीनगर, सावळज, खानापूर, खरसुंडी, संख, ढालगांव, कोकरुड या ग्रामीण भागातील शाखांचा समावेश करून प्रस्ताव पाठविला आहे·

५·१२ जलद सेवा :-

देशाच्या अर्थव्यवस्थेत बँका या आर्थिक सेवा पुरविणाऱ्या संस्था आहेत· बँकिंग रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे बँकांना ठेवी स्विकारणे व कर्ज देणे ही प्रमुख कार्ये करावी लागतात· प्राथमिक शिक्षक बँकेच्या संचालकांशी ठेवीदारांना व

कर्जदारांना चांगल्या सेवा पुरविण्याकरिता कोणत्या योजना राबविल्या, याविषयी चर्चा करण्यात आली. जे कर्जदार बँकेकडे पोटनियमानुसार कर्ज मागणी व रोखे पूर्ण करुन आणतील त्यांना ताबडतोब कर्ज दिले जाते. त्याचप्रमाणे ठेवीदारांच्या ठेवीही ताबडतोब ठेऊन त्यांना पावत्या दिल्या जातात. याशिवाय ठेवीदारांना ठेवींच्या संरक्षणाबद्दल माहिती दिली जाते. जलद सेवा हा बँकेचा मुख्य हेतु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## ५.१३ रिझर्व्ह बँकेची बंधने :-

देशातील कोणत्याही बँकांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असते. देशाच्या अर्थव्यवस्थेत समतोल राखण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर आहे. रिझर्व्ह बँकेच्या धोरणाविषयी संचालक मंडळाशी चर्चा केली असता या चर्चेतून असे मत व्यक्त करण्यात आले की, शाखाविस्ताराबाबत व बँकिंग परवाना मिळण्याबाबत रिझर्व्ह बँकेने जाचक बंधने घातली आहेत. त्यामुळे शाखाविस्तारामध्ये अडचणी निर्माण होतात. या अडचणी दूर होऊन शाखा विस्तारास परवानगी मिळावी.

परंतु काही वेळा रिझर्व्ह बँकेची बंधने आवश्यक आहेत. ही पगारदार नोकरदारांची एकमेव बँक असल्यामुळे आर.बी.आय. ची बंधने पाळूनच सर्व व्यवहार करावे लागतात. अग्रक्रम क्षेत्रात ६०% कर्जपुरवठा करण्याची अट शिथील करावी, असे मत व्यक्त केले.

## ५.१४ मिटींग, विचार विनिमय, चर्चा यातून निर्णय :-

संचालक मंडळास गरजेनुसार व परिस्थितीनुसार बँकेची मिटींग घ्यावी लागते. ही मिटींग महिन्यातून दोनदा आवश्यक वाटल्यास तीनदा घेतली जाते. या मिटींगमध्ये मागील प्रोसिडींग वाचून कायम करणे, नविन सभासद करवून घेणे, ठेवी स्वीकारणे, कर्ज देणे, गुंतवणूक करणे व येनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

असे विविध प्रश्न हाताळले जातात. या मिटींगना उपस्थिताचे प्रमाण ७५ ते १०० % असे असते.

५.१५ बँकेची जलद गतीने प्रगती :-

बँकेचा विकास अगर प्रगती ही बँकेच्या नव्या योजना व ठेवी जमविण्याचे नवे लक्ष्य ठरवून ते साध्य करून प्रगती साध्य करता येते. प्राथमिक शिक्षक बँकेचा १९८१ ते १९९४ या कालावधीच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर असे आढळून आले आहे की, बँकेने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे.

बँकेची वसुली ही वेळच्या वेळी होते. भांडवलात घट होत नाही, मासिक वर्गनी रुपये ५०/- घेतल्यामुळे भांडवलात वाढ होते आहे. याचा उपयोग कर्जे देण्यासाठी करता येतो. जलद सेवा उपलब्ध करून दिली जाते. संचालक मंडळाची काम करण्याची पध्दती, नोकरांची कार्यक्षमता यामुळे बँकेची प्रप्रगती जलद गतीने होत आहे.

५.१६ बँकेची वेगळी वैशिष्ट्ये :-

तुमच्या बँकेची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत काय, याविषयी संचालक मंडळाशी चर्चा केली असता. त्यांनी बँकेची काही वेगळी वैशिष्ट्ये सांगितली रिबेट योजना, पिग्मी योजना, रिकरिंग योजना, गुणी मुलांना उत्तेजन, मयत सभासदांना सुट, तातडीची मदत, मोठ्या आजारांना आर्थिक सहाय्य, आदर्श शिक्षक पुरस्कार, शाखाविस्तार, सभासदांची आर्थिक सुविधा उपलब्ध करवून देणे. नफा हा एकमेव हेतू न ठेवणे. सभासदांची सेवा करणे. ही बँकेची वेगळी वैशिष्ट्ये आहेत.

## ५.२७ सेवक प्रशिक्षण योजना :-

बँकेची यशस्वीता ज्याप्रमाणे ठेवीवर, कर्जावर अवलंबून असते. त्याच प्रमाणे सेवकांची कार्यक्षमता व त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण यावरही अवलंबून असते. संचालक मंडळाशी सेवक वर्ग या बाबतीत चर्चा केली असता असे सांगितले की, बँकेचा सेवकवर्ग व त्यांची कार्यक्षमता चांगली आहे. सेवकांची कार्यक्षमता वाढावी म्हणून प्रशिक्षण देण्याची योजना आहे. बँकेकडे असलेल्या नविन कर्मचा-यांना प्रशिक्षणाची सोय बँकेमार्फत करण्यात आली आहे. लेखनिक वर्गाला प्रशिक्षणाची अत्यंत जरुरी असते. त्यांना विविध शिबीरे अटेंड करण्यासाठी पाठविले जाते.

## ५.२८ कार्यक्षम सेवक वर्ग :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या नफ्यात सतत वाढ होत जाण्याची कारणे कोणती यावर चर्चा करीत असताना वाढत्या ठेवी, वाढता कर्जपुरवठा, तरुण, हुशार, प्रामाणिक व सेवाभावी सेवकवर्ग, सेवकांची कामातील सचोटी, तसेच सर्व सेवकांचे ग्राहक व संचालकांशी परस्पर संबंध यामुळे ही बँक सांगली जिल्ह्यातील कानाकोप-यात पोहचली आहे. त्यामुळेही बँकेच्या नफ्यात वाढ होत आहे.

## ५.२९ सहकाराची भावना जोपासली :-

शेवटी बँकेच्या संचालकांना व व्यवस्थापकांना बँकेच्या कार्यक्षेत्रात काम करीत असताना तुम्हाला कोणकोणते अनुभव आले याबाबत प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा त्यांनी सांगितले की, बँकेमूळे आम्हाला समाजाचे जवळून दर्शन मिळाले आहे. समाज कशा परिस्थितीत आहे. प्राथमिक शिक्षकांच्या कोणत्या अडचणी आहेत, याची कल्पना आली आणि बँकेच्या माध्यमातून समाजातील शिक्षकांची सेवा करण्याची संधी मिळाली. सहकाराची भावना सर्वांच्या मनात जोपासली आहे, याची कल्पना आली.